ePaper
एकनाथ शिंदे अपात्र झाले तरीही तेच मुख्यमंत्री राहणार : देवेंद्र फडणवीस



| वर्ष - 7 | अंक - 171 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**
- रचिन-निशमची झूंज व्यर्थ!
- शिल्पाचा बिझनेस माइंड
- दहशतवादाविरोधात नवे कायदे!
- धुळ्यात राजकीय मेळावे, बैठकांना बंदी!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 29 ऑक्टोबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मराठा आरक्षणासाठी 'बळी'!

## » इंद्रायणीत जीवनयात्रा संपवली : सरकारने जागे व्हावे

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाचा मुद्दा आता चांगला तापला आहे. जागोजागी मराठा कार्यकर्ते राजकीय नेत्यांना काळे झेंडे दाखवत आहेत. तसंच त्यांचे कार्यक्रम उधळून लावण्याचा प्रयत्न आहे. तर दुसरीकडे पिंपरी चिंचवड शहरामध्ये मराठा आरक्षणाला गालबोट लागण्याची घटना घडली.**

आळंदी परिसरामध्ये एका व्यक्तीनं मराठा आरक्षण मिळावं, अनुकंपा तत्वावर मुलाला नोकरी मिळत नसल्याच्या नैराश्यातून आत्महत्या केलीय. त्यानं चिठ्ठी लिहित इंद्रायणी नदीमध्ये उडी मारून जीवनयात्रा संपली. ही घटना काल 27 ऑक्टोबर 23 शुक्रवार रोजी रात्री आठ वाजाच्या सुमारास घडली. व्यंकट ढोपरे (रा. नव्हे आंबेगाव,पुणे) असं आत्महत्या केलेल्या व्यक्तीचं नाव आहे. तीर्थक्षेत्र आळंदी येथे काल शुक्रवारी व्यंकट ढोपरे पुण्याच्या नव्हे आंबेगाव भागातून माऊलीच्या दर्शनासाठी आले होते. दर्शन घेतल्यानंतर रात्री आठ वाजेच्या सुमारास त्यांनी इंद्रायणी पात्रात उडी मारत आत्महत्या केली. उडी मारल्यानंतर तत्काळ काही वेळानंतर स्थानिकांनी आळंदी पोलीस ठाण्यात माहिती



दिली. घटनेची माहिती मिळताच आळंदी पोलीस पथक, अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. रात्री उशिरापर्यंत त्यांचा शोध घेण्यात आला. मात्र अंधार असल्याकारणानं रात्री अकरा वाजता शोधकार्य थांबविण्यात आलं. त्यानंतर आज सकाळी पुन्हा शोध कार्य सुरू करण्यात आलं. शोध मोहीम सुरू असताना सकाळी अकरा वाजेच्या सुमारास त्यांचा मृतदेह इंद्रायणी नदीमध्ये आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह बाहेर काढला. मयत व्यक्तीच्या कुटुंबीयांना घरातच एक चिट्टी सापडली. मी सरपंच असल्यापासून प्रयत्न करतो, तरी सरकार याला गांभीर्यानं घेत नाही. 2012 पासून माझ्या मुलाला अनुकंपावर नोकरी दिली जात नाही. आईच्या वडिलांच्या जागी त्याला नोकरी मिळावी म्हणून आम्ही प्रयत्न करतोय. पण प्रशासन आम्हाला न्याय देत नाहीत. याचं नैराश्यातून मी आत्महत्या करीत आहे, असा आशय त्या चिठ्ठीत होता. त्यामुळं भोसरीत राहणाऱ्या जावयास याबाबत कळवण्यात आलं. तेंव्हा आळंदीत त्यांचा शोध घेताना बंधाऱ्यालगत त्यांची पिशवी, मोबाईल, गळ्यातील माळ, चप्पल अन ज्ञानेश्वरीमधील काही कागद सापडले. त्याच बंधाऱ्यात पोलीस, एनडीआरएफनं शोध घेतला. आज तिथंच त्यांचा मृतदेह आढळला.

### इंद्रायणी नदीपात्रात घेतली उडी

» तीर्थक्षेत्र आळंदी येथे काल शुक्रवारी व्यंकट ढोपरे पुण्याच्या नव्हे आंबेगाव भागातून माऊलीच्या दर्शनासाठी आले होते. दर्शन घेतल्यानंतर रात्री आठ वाजेच्या सुमारास त्यांनी इंद्रायणी पात्रात उडी मारत आत्महत्या केली. उडी मारल्यानंतर तत्काळ काही वेळानंतर स्थानिकांनी आळंदी पोलीस ठाण्यात माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच आळंदी पोलीस पथक, अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले.

# जनरल मोटर्स कामगारांचा लढा होणार बळकट!

## » पिंपरी चिंचवड सोसायटी फेडरेशनकडून पाठिंबा ; ठरावाला संमती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळेगाव दाभाडे येथील जनरल मोटर्स कामगारांच्या लढ्यात चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे सभासद देखील उतरणार आहेत. फेडरेशनच्या वतीने नुकताच तसा ठराव करण्यात आला आहे. शहरातील विविध सोसायट्यांमध्ये राहणारे नागरिक त्या लढ्यात असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे या लढ्याला आता बळकटी येणार आहे.**







जनरल मोटर्स कंपनी मधील कामगारांनी आपल्या न्याय, हक्क व इतर मागण्यांसाठी साखळी उपोषणाचा पर्याय निवडला आहे. अहिंसेच्या मार्गाने आपल्या आंदोलनाचा मार्ग निवडला आहे. यामधील बहुतांश कामगार पिंपरी चिंचवड शहरातील सोसायट्यांमधे राहणारे आहेत. चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे सदस्य आहेत. त्यामुळे कामगारांच्या या साखळी उपोषणाला पाठिंबा देण्याबाबतचा ठराव फेडरेशनच्या वतीने मंजूर करण्यात आला आहे. रस्त्यावरची लढाई लढण्याची वेळ आल्यानंतरही संबंधीत कामगारांच्या बरोबरीने रस्त्यावर ऊतरू, असा इशाराही फेडरेशनच्या वतीने देण्यात आला आहे. त्यामुळे जनरल कामगार मोटर्सच्या कामगारांच्या लढ्याला आणखीन बळ मिळणार आहे.

> पिंपरी चिंचवड शहरातील गृहनिर्माण संस्थेतील सभासद जनरल मोटर्स कंपनीमध्ये काम करत आहेत. सदर कंपनीने या सर्व कामगारांना कामावरून कमी करून खूप मोठा अन्याय केलेला आहे. या सर्व कामगारांवर अवलंबून असलेल्या त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची यामुळे उपासमार होत आहे. तरी महाराष्ट्र सरकारने आणि केंद्र सरकारने यामध्ये लक्ष घालून या कामगारांना न्याय मिळवून द्यावा.
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष.**
> **चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन**

### सरकारवर दबाव वाढणार

» चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनमध्ये हजारो सभासदांचा सहभाग आहे. यासह शहरातील सर्वच भागातील सोसायटीधारकांशी या फेडरेशनसोबत समन्वय आहे. त्यामुळे शहरातून मोठा प्रतिसाद जनरल मोटर्स कामगारांच्या आंदोलनाला मिळणार आहे. या कामगारांच्या लढ्याची तीव्रता वाढल्यास राज्य सरकारवर दबाव निर्माण होऊन त्वरीत योग्य तो निर्णय घ्यावा लागणार आहे.

# मेट्रो स्थानकांच्या उभारणीत त्रुटी!

## महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी त्रुटी असल्याची दिली कबुली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मेट्रो स्थानकांच्या उभारणीतील त्रुटी काही ज्येष्ठ अभियंत्यांनी समोर आणल्या होत्या. यामुळे मेट्रोच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या मुद्द्यावरून शुक्रवारी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली.**



त्यावेळी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी काही त्रुटी असल्याची कबुली देत दुरुस्ती सुरू असल्याचे सांगितले. दानवे यांनी महामेट्रोच्या कार्यालयाला भेट देऊन मेट्रो प्रकल्पाचा आढावा घेतला. या वेळी महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे उपस्थित होते. या शिवसेनेचे (ठाकरे गट) माजी आमदार चंद्रकांत मोकाटे यांच्यासह इतर नेतेही बैठकीला उपस्थित होते. या वेळी दानवे यांनी पुण्यातील काही ज्येष्ठ अभियंत्यांनी मेट्रो स्थानकांच्या सुरक्षिततेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचा उल्लेख केला. मेट्रोची सुरक्षितता ही जनतेच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाची असून, त्यात त्रुटी आहेत का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावर महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे यांनी कामात काही त्रुटी असल्याची कबुली दिली. या त्रुटी सामान्य असून, त्या दूर करण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. मेट्रोच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित करणारे सर्व तज्ज्ञ व्यक्ती आहेत. त्यामुळे त्यांच्या म्हणण्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्यावर महामेट्रोने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा दानवे यांनी व्यक्त केली. तांत्रिक कारणामुळे मेट्रो बंद पडत असल्याचाही मुद्दा बैठकीत उपस्थित करण्यात आला. या घटना आठवड्यातून एखाद्या वेळी घडत असून, त्यावर उपाययोजना केल्या जात आहेत, असे महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. मेट्रोच्या स्थानकांना महापुरुषांची नावे देण्यात यावी, अशी मागणी दानवे यांनी केली. याचबरोबर शिवाजीनगर स्थानकाचे नाव छत्रपती शिवाजीनगर आणि रूबी हॉल स्थानकाचे नाव माता रमाबाई आंबेडकर स्थानक करावे, अशी सूचना त्यांनी केली. यावर महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी राज्य सरकारला प्रस्ताव पाठविण्यात येईल, असे सांगितले. “मेट्रो स्थानकांच्या सुरक्षिततेबाबत आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नांना महामेट्रोने थातूरमातूर उत्तरे दिली आहेत. त्यांनी आमच्या मुख्य प्रश्नांना बगल दिली आहे.

### तांत्रिक कारणामुळे मेट्रो बंद

» महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे यांनी कामात काही त्रुटी असल्याची कबुली दिली. या त्रुटी सामान्य असून, त्या दूर करण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. मेट्रोच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित करणारे सर्व तज्ज्ञ व्यक्ती आहेत. त्यामुळे त्यांच्या म्हणण्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्यावर महामेट्रोने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा दानवे यांनी व्यक्त केली. तांत्रिक कारणामुळे मेट्रो बंद पडत असल्याचाही मुद्दा बैठकीत उपस्थित करण्यात आला. या घटना आठवड्यातून एखाद्या वेळी घडत असून, त्यावर उपाययोजना केल्या जात आहेत, असे महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# इंद्रायणीनगर येथे नवरात्रौत्सवाला उदंड प्रतिसाद!

## माजी नगरसेविका नम्रता लोंढे, योगेश लोंढे यांचा पुढाकार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठान इंद्रायणीनगर, माजी नगरसेविका नम्रता लोंढे, योगेश लोंढे यांच्या वतीने आयोजित भव्य नवरात्रौत्सव 2023 उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी हा नवरात्रोत्सव आयोजित केला जातो. यंदाही त्याचे आयोजन करण्यात आले होते.**



या निमित्त आयोजित सामुदायिक दुर्गासप्तशती पाठ पठणामध्ये 178 महिलांनी सहभाग घेतला. सहभागी महिलांचा सन्मान करण्यात आला. दरवर्षी नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी विविध स्तुत्य उपक्रम राबविण्या आल्याचे आयोजकांनी सांगितले. सप्तमीला प्रभागातील महिला भगिनींच्या वतीने सामुदायिक दुर्गासप्तशती पाठ पठण आयोजित केला होता. त्यामध्ये 178 महिलांनी सहभाग घेतला. त्यावेळी त्या सर्व महिलांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. 2023 च्या गौरी गणपती सजावट स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना या वेळी बक्षीस वाटप करण्यात आले. यामध्ये सुचेता इनामदार, संगिता डुंबरे, वृषाली राऊळ, नलिनी चव्हाण यांना अनुक्रमे प्रथम, द्वीतीय, तृतीय आणि चतुर्थ क्रमांक देण्यात आला. या उत्सवादरम्यान प्रत्येक दिवशी प्रभागातील सर्व सोसायटीमधील नागरिकांना आरतीसाठी निमंत्रित करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. तसेच प्रभागातील महिला भजनी मंडळाच्या वतीने भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात नागरिकही तल्लीन होऊन सहभागी झाले. हिंदुत्वाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने शिववंदना घेण्यात आली. परिसरातील नागरिक, लहान मुलांच्या आनंदासाठी मोठे पाळणे, ड्रॅगन, बोट, ब्रेक डान्स आदी खेळाची सुविधा देण्यात आली होती. त्याचा नागरिकांनी सहकुटुंब आनंद घेतला. अष्टमीच्या दिवशी होम हवन झाले. या वेळी आमदार महेश लांडगे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. शेवटच्या दिवशी कामगार नेते सचिन लांडगे, कार्तिक लांडगे यांच्या हस्ते सलग नऊ दिवस उत्कृष्ट रासगरबा दांडिया खेळणाऱ्या स्पर्धकांचा सन्मान करण्यात आला. स्पर्धकांना टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, ओव्हन बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

### दिवसाकाठी 15 हजार नागरिकांची नोंद

» रासगरबा, दांडिया, विविध खेळांची स्पर्धा आदीसह विविध स्तुत्य उपक्रम राबविल्यामुळे नवरात्रोत्सव कार्यक्रमात भोसरी परिसरातील नागरिक आपली उपस्थितीत लावत होते. त्यामुळे या उत्सवाची रंगत वाढली होती. दिवसाकाठी सुमारे 15 हजार नागरिकांची नोंद होत होती. भेट देणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण होते.

# भारतमातानगर दिघी ते भोसरी-आळंदी रस्ता होणार 'सुपरफास्ट'!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या भारमातानगर दिघी ते भोसरी-आळंदी रस्त्याच्या काँक्रीटीकरणच्या कामाला अखेर मुहूर्त मिळाला आहे. दिघी ग्रामस्थांच्या मागणीनंतर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. त्यानुसार या कामाचे भूमीपूजन करण्यात आले आहे.**



२०१९ मध्ये जागामालक प्रशासन यांच्यातील विसंवादावर तोडगा काढून कच्चा रस्ता उपलब्ध झाला होता. आता काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण करुन 'सुपरफास्ट' रस्ता कार्यान्वयीत करण्यात येणार आहे. यावेळी ह.भ.प. दत्ता गायकवाड, माजी नगरसेविका निर्मला गायकवाड, माजी नगरसेविका आशा सुपे, मीना पाटील, माजी नगरसेवक सागर गवळी, विकास डोळस, कुलदीप परांडे, संजय गायकवाड, चेतन घुले, माजी सैनिक संघाचे अध्यक्ष नरेंद्रसिंग चौव्हान, आमसिध्द भीसे, धनवे, पनवर, किशोर नवले उपस्थित होते. भारमातानगर दिघी ते भोसरी आळंदी रस्त्याची दुरवस्था झाली होती. रस्त्यात खड्डे पडले होते. पावसाळ्यात पाणी साचून राहत होते. परिणामी वाहनधारकांना त्यामधून मार्ग काढताना जिकिरीचे होत असे. रस्ता काँक्रीटीकरण करणे गरजेचे असल्याचे सातत्याने नागरिकांचे म्हणणे होते. आमदार महेश लांडगे यांच्याकडे परिसरातील नागरिकांनी तक्रारींचे गाऱ्हाणे मांडले. आमदार लांडगे यांनी आमदार निधीतून हे काम हाती घेतले आहे. भारतमातानगर दिघी ते भोसरी आळंदी रस्ता काँक्रीटीकरणाच्या कामाचे भुमिपूजन करण्यात आले आहे.

### स्थानिक नागरिकांनी मानले आभार...

रस्ता तयार करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या पांडुरंग वाळके, विकास वाळके, प्रसन्न वाळके, काळुराम वाळके यांच्या व मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. या वेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते. प्रलंबित रस्त्याच्या कामाला गती मिळाल्याने भारतमातानगर येथील नागरिकांच्या वतीने आ. महेश लांडगे यांचे आभार मानण्यात आले आहेत.



> दिघी जोडणाऱ्या पर्यायी रस्त्यांचा विकास करण्यासाठी आम्ही 'व्हीजन-२०२०' अंतर्गत पुढाकार घेतला होता. भोसरी-आळंदी रस्त्याला जोडणाऱ्या या रस्त्याची दुरवस्था झाली होती. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम हाती घेतले आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात काम पूर्ण करुन रस्ता सेवेत दाखल होईल.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा,

# यशस्वी जीवनासाठी अविरत संघर्ष हाच पर्याय!

## प्रा. गणेश शिंदे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन : रायुकाँतर्फे व्याख्यान उपक्रम

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'तुझं आहे तुजपाशी परी तू जागा चुकल्याशी, या युक्तिप्रमाणे उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा योग्य वापर करून उच्च ध्येय गाठावे. आपल्या जीवनात यश मिळवायचे असेल, तर अविरत संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे. तरुणांनी स्व:त्व जाणावे. शिक्षण, ज्ञान या शिवाय यश नाही. स्वतः मधले वेगळेपण शोधून स्वतःचे अस्तित्व निर्माण केले पाहिजे, असे मार्गदर्शन प्रा. गणेश शिंदे यांनी केले.**




राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शेखर काटे यांच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवडमध्ये विद्यार्थी-युवकांना मार्गदर्शन मेळाव्यांचे नियोजन केले आहेत. या उपक्रमांतर्गत भोसरीतील राजमाता जिजाऊ महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत "सद्य:परिस्थिती आणि युवकांचे भवितव्य" या विषयावर गणेश शिंदे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. या वेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल काटे, प्राचार्य डॉ. के. जी. कानडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर, प्रदेश सरचिटणीस विशाल काळभोर, पिंपरी चिंचवड युवकाध्यक्ष शेखर काटे, माजी नगरसेवक विक्रांत लांडे, पंकज भालेकर, शहर कार्याध्यक्ष प्रसाद कोलते, तुषार ताम्हाणे, मंगेश असवले, रोहन शिंदे, रमेश कांबळे, रोहित काटे, कुणाल सोनवणे आदीसह पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी उपस्थित होते. शहराध्यक्ष अजित गव्हाणे म्हणाले की, 'जिजाऊंनी जसे शिवबा घडवले' त्याप्रमाणे आदर्श ठेवून भवितव्याची वाटचाल करणे गरजेचे आहे. चांगले राज्य निर्माण करण्यासाठी शिवबांच्या आदर्शावर चालणे आवश्यक आहे. प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी 'फटाके मुक्त दिवाळी' साजरी करण्याचा संकल्प केला. तसेच वेगवेगळ्या संकल्पना व्यक्त करून त्या अमलात आणण्यासाठी उपाययोजना सुचवल्या. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जैन यांनी देखील विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. राष्ट्रवादीचे नेते आणि माजी आमदार विलास लांडे यांनी या उपक्रमाचे कौतूक केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. अनिल गंभीरे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सुग्रीव आडाल यांनी सूत्रसंचालन केले. तुषार ताम्हाणे यांनी आभार मानले.

> विद्यार्थी-युवकांमध्ये आदर्श मूल्ये रुजली पाहिजेत. युवक हा भारत देशाचे भविष्य आहे. पाया भक्कम झाला पाहिजे. त्यासाठी युवकांना मार्गदर्शन मेळावा आयोजित करीत आहोत. शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तीनही मतदार संघामध्ये मान्यवरांच्या कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या जीवनातील प्रसंगाचे दाखले देत प्रा. गणेश शिंदे यांनी युवकांना नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. हा उपक्रम निश्चितपणे पथदर्शी ठरणार आहे.
>
> **- शेखर काटे,** शहराध्यक्ष,




# भाजपमधील बंडाळी काँग्रेसच्या पथ्यावर?

**राजस्थानात आजवर कोणत्याही पक्षाला सलग दोन वेळा सरकार बनविण्याची संधी दिलेली नाही. अशोक गेहलोत यांच्या सरकारवर इतिहासाची टांगती तलवार उभी आहेच. गेहलोत यांची कारकीर्दही तशी वादग्रस्त राहिली आहे. गेहलोत-पायलट गटात दिसत असलेले ऐक्य आणि भाजपमधील बंडाळी ही मात्र काँग्रेसच्या पथ्यावर पडू शकते.**



'मोदी तुमसे बेर नही, लेकिन वसुंधरा तेरी खैर नही,' असा नारा गतवेळच्या राजस्थानच्या विधानसभा निवडणुकीत घुमला होता. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल काहीही वैर नसल्याचे सांगत, वसुंधराराजे शिंदे यांना धडा शिकविण्याचा निर्धार राजस्थानच्या जनतेने केला होता आणि त्यानुसार काँग्रेसच्या पारड्यात लोकांनी भरभरून मतेही टाकली होती. गेल्या पाच वर्षांची मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांची कारकीर्द वादग्रस्त राहिली आहे. हिंदू सणांवेळी धार्मिक मिरवणुकांवर विशिष्ट वर्गाकडून झालेले प्राणघातक हल्ले, सरकारकडून या वर्गाच्या लांगूलचालनाचा झालेला आरोप, कन्हैया हत्याकांड, वाढता भ्रष्टाचार आदी कारणांमुळे गेहलोत सरकार गाजले. सलग दुसऱ्यांदा विजय प्राप्त करण्यासाठी गेहलोत यांनी कंबर कसली आहे. मात्र त्यांच्यासमोर भाजपने मोठे आव्हान आहे. राजस्थानच्या जनतेने कुठल्याही पक्षाला सलग दुसऱ्यांदा सरकार बनविण्याची संधी दिलेली नाही. हा इतिहास बदलण्याची अपूर्व संधी काँग्रेसचे नेते अशोक गेहलोत यांच्यासमोर आहे. भाजपच्या विविध गटांदरम्यान उसळलेली बंडाळी एक प्रकारे काँग्रेसच्या पथ्यावर पडण्याची शक्यता आहे. भाजपला पुन्हा सरकार बनवायचे असेल, तर गट-तट विसरून एकसंध होणे आवश्यक ठरणार आहे. राजस्थानच्या निवडणुकीत भाजपने खासदारांची फौज उतरविलेली आहे. यावरूनच पक्षाने ही निवडणूक किती प्रतिष्ठेची केली आहे, याची कल्पना येते. काँग्रेसमधे गटबाजी आहे असे नाही; पण या पक्षात गहलोत आणि सचिन पायलट असे दोनच प्रमुख गट आहेत. दुसरीकडे, भाजपमधे असंख्य गट-तट कार्यरत आहेत. यातील प्रमुख गटांमधे बसुंधराराजे गट, गजेंद्रसिंह शेखावत गटांचा समावेश होतो. तिकीट वाटपात बसुंधराराजे गटाकडे दुर्लक्ष केले जात असल्याची वदंता आहे. या पार्श्वभूमीवर या गटाचे अनेक नेते अपक्ष म्हणून निवडणुकीत उतरण्याच्या तयारीत आहेत. मागील 'काही काळात हा गट कमजोर झालेला असला तरी त्याची भाजपची नुकसान करण्याची या गटाची क्षमता आहे, हे विसरता येत नाही. जयपूर क्षेत्रात विधानसभेच्या १९ जागा आहेत. येथील पाच उमेदवारांच्या नावांची घोषणा भाजपने केली आहे. विशेष म्हणजे जाहीर करण्यात आलेल्या तीन नावांना मोठा विरोध होत आहे. राज्याच्या इतर भागात जवळपास अशीच स्थिती आहे. याला कारण म्हणजे आक्रमक झालेला वसुंधराराजे गट हे होय. भाजपने झोटवाडा मतदारसंघात खा. राजवर्धनसिंह राठोड यांना तिकीट दिले आहे. आशुसिंह सूरपुरा यांचे कार्यकर्तेही रस्त्यावर उतरले आहेत. तिकीट कापण्यात आलेले काही नेते काँग्रेसच्या मार्गावर आहेत. तसे झाले तर भाजपसाठी तो मोठा धक्का ठरेल. राज्यातील कोटा विभाग भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र मागील काही काळात याठिकाणी काँग्रेसची ताकद वाढली आहे. कोटा विभाग पिंजून काढण्यासाठी आगामी काळात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, पक्षाचे प्रदेश प्रभारी सुखजिंदरसिंह रंधावा, मुख्यमंत्री गेहलोत तसेच प्रदेशाध्यक्ष गोबिंद डोटासरा हे दौरे करणार आहेत. गत विधानसभा निवडणुकीचा विचार केला, तर १२ क्षेत्रांत चारमधील ३ जागा काँग्रेसने जिंकल्या होत्या. कोटामधील ६ पैकी ३, तर बुंदी जिल्ह्यातील ३ जागांवर काँग्रेसने विजय मिळवला होता. यावेळी त्या कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचा काँग्रेसचा निर्धार आहे. राजस्थानमधे विधानसभेच्या २०० जागा आहेत आणि बहुमतासाठी कोणत्याही पक्षाला १०१ चा आकडा गाठणे आवश्यक आहे. सुधारित वेळापत्रकानुसार राज्यात येत्या २५ नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. मागील पाच वर्षात समाजातील विविध घटकांसाठी राबविलेल्या जनहिताच्या योजना निवडणुकीत आपणास तारतील, असा मुख्यमंत्री गेहलोत यांना विश्वास आहे.

## संपादकीय »

# गुदमरला श्वास!

***'सध्या हवा चांगली नाही' असे म्हटले, तर कदाचित ते राजकीय वक्तव्य ठरू शकते इतके आपले पर्यावरण राजकारणग्रस्त बनले आहे.***

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका आणि पाठोपाठ येणाऱ्या लोकसभा निवडणुकीमुळे ते नक्कीच राजकीय वाटू शकते. अर्थात, ते राजकीय नसले, तरी त्याचा राजकारणाशी असलेला संबंध नाकारता येत नाही. हवा खराब होण्याची जी कारणे आहेत, त्यामागे विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची ओरबाडणूक करण्याची वृत्ती आहे. अमर्याद वृक्षतोड, डोंगरांची फोडाफोड आहे. अवघे दिल्ली शहर धुक्यात लपेटल्याचे चित्र दिसते; परंतु धुक्यात लपेटलेल्या शहराचे हे चित्र लुभावणारे नाही, तर ते धुराने अक्षरशः लपेटलेले आहे आणि लोक त्यात गुदमरत आहेत. पंजाबमध्ये जाळली जाणारी पराली (पाचट), वाढत्या वाहनांचा धूर आणि बांधकामांमुळे हवेत पसरलेली धूळ यामुळे राजधानी दिल्लीत धुक्याचे साम्राज्य पसरले आहे. अलीकडच्या काळात हे दरवर्षी घडत असताना त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना न करता तात्पुरता तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जातो.

**वहिदा रेहमान हिला नुकताच दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला. वहिदाचे मोठेपण कशात आहे शोधायचं तर, तिनं स्वतःचे मोठेपण कधीही मिरवले नाही, याच्यात आहे. कायमच खुल्या मनाने बदलांना सामोरे जाण्याची वृत्ती वहिदाकडे असल्याने, ती तिच्या ८५ वर्षांतही कालबाह्य वाटत नाही. आजवर हिंदी चित्रपटातील कोणत्याही अभिनेत्रीला वहिदाइतका आदर सन्मान मिळालेला नाही.**

# मोठेपण न मिरवणारी मोठी अभिनेत्री



मुख्य धारेच्या हिंदी चित्रपटांमधील सशक्त आणि बहुगुणी अभिनेत्री वहिदा रेहमानला दादासाहेब फाळके पुरस्कार मिळणे हे अत्यंत योग्य असून, त्याबद्दल अवघ्या भारतवासीयांना आनंद होणे स्वाभाविक आहे. हिंदी चित्रपटांतील अल्टिमेट सौंदर्यवती म्हणजे मधुबाला. वहिदाला अनुपम खेरने तुमच्याइतके अनुपम सौंदर्य कोणाचेही नव्हते, असे म्हटल्यावर, वहिदाने स्वतःहून मधुबालाचा उल्लेख केला आणि मी सुंदर नाही, असे ठामपणे सांगितले. ज्यावेळी सुशिक्षित घरातील मुली चित्रपटक्षेत्रात फारशा येत नव्हत्या, तेव्हा तुम्ही आलात, अशी कॉम्प्लिमेंट कुणीतरी दिली, तेव्हा बीना राय, आशा माथुर (मयूरपंख, लाखों में एक, नक़ाब) अशा नायिका तोपर्यंत रुपेरी दुनियेत आल्या होत्या, अशी माहिती वहिदाने आवर्जून दिली. वहिदाचे मोठेपण म्हणजे, तिने कधीही स्वतचे मोठेपण ना मिरवले, ना सांगितले. आपल्या आधी आशा पारेखला दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला, याबद्दल वहिदाने किंचितही खंत व्यक्त केली नाही. उलट आपल्या मैत्रिणीला तो सर्वोच्च सन्मान मिळाल्याबद्दल मनापासून आनंद व्यक्त केला. हिंदी चित्रपटातील कोणत्याही अभिनेत्रीला आजवर वहिदाइतका आदर व सन्मान मिळालेला नाही. चित्रपटक्षेत्रातील नवनवीन पिढ्यांमधील नायक-नायिका असोत अथवा दिग्दर्शक, त्यांना वहिदाबरोबर काम करता यावे, असे नेहमी वाटत असते. ट्विंकल खन्ना असो किंवा अनुष्का शर्मा, यासारख्या नट्या वहिदाला भेटण्यास नेहमी उत्सुक असतात.अमिताभ बच्चनची सर्वात आवडती अभिनेत्री वहिदा असून, जयाच्या आधी वहिदा भेटली असती, तर ती सहचरी म्हणून अधिक पसंत पडली असती, असे गमतीने एकदा अमिताभ म्हणालाही होता. तर अभिषेकने ओम जय जगदीश तसेच दिल्ली 6 या चित्रपटांत वहिदाच्या सावलीखाली काम केले. त्यातील 'ससुराल गेंदा फूल' या गाण्यात अभिषेकबरोबर वहिदा आधुनिक शैलीत नाचली आहे. हे गाणे पारंपरिक असले, तरी अभिषेकच्या स्टायलीत वहिदा नाचत त्याच्याकडे जे कौतुकाने आणि आनंदाने पाहते, ते केवळ अपूर्व आहे. खुल्या मनाने बदलांना सामोरे जाण्याची वृत्ती वहिदाकडे असल्यामुळे ती आज ८५ वर्षांची असली, तरी कालबाह्य वाटत नाही. वहिदा ही चेन्नईची. वडील आयएएस ऑफिसर असल्यामुळे घरातले वातावरण आधुनिक आणि उदारमतवादी होते. त्यामुळे त्या काळातली मुस्लिम मुलगी असूनही वहिदाला घरच्यांनी भरतनाट्यम् शिकण्यास आणि नृत्याचे कार्यक्रम करण्यासही परवानगी दिली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# धुळ्यात राजकीय मेळावे, बैठकांना बंदी!

## » दादा भुसे यांच्यासह नाना पटोलेंना फटका




। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत मंत्री आणि पुढाऱ्यांना जिल्हा बंदी करण्याचा निर्णय धुळ्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने घेण्यात आला. याचा फटका आज राज्याचे मंत्री दादा भुसे यांना देखील बसला. धुळ्यात आज होणारी बैठक मंत्री भुसे यांना रद्द करावी लागली. तर रविवारी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत होणारा शेतकरी मेळावा देखील काँग्रेसने रद्द केला आहे.**

मराठा आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी हा मेळावा रद्द करण्यात आल्याची माहिती आमदार कुणाल पाटील यांनी दिली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे ,या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी धुळ्यात जेल रोडवर सकल मराठा समाजाच्या वतीने साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. या उपोषणा अंतर्गतच आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत धुळे जिल्ह्यात मंत्री आणि पुढाऱ्यांना प्रवेश बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पण आज राज्याचे मंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत रेल्वे स्टेशन परिसरातील एका हॉटेलमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ही माहिती आंदोलन करणाऱ्या मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना मिळाल्याने त्यांनी ही बैठक हाणून पाडण्याचा निर्णय आंदोलन स्थळी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी या बैठकीत मराठा आंदोलनाकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारचे प्रतिनिधी असणाऱ्या मंत्री भुसे यांच्यासमोर निदर्शने करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार संबंधित हॉटेलच्या बाहेर मंत्री भुसे यांना काळे झेंडे दाखवण्याची तयारी देखील करण्यात आली. मात्र मंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत होणारी ही बैठक ऐनवेळी रद्द करण्यात आली. दरम्यान रविवारी (दि. २८) काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले तसेच कार्याध्यक्ष आमदार कुणाल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत धुळ्यात शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मात्र आमदार कुणाल पाटील यांनी मराठा समाजाच्या वेगवेगळ्या आंदोलनात प्रत्येक वेळी भाग घेतला आहे. धुळे ग्रामीण परिसर तसेच शहरी परिसरात देखील मोठ्या प्रमाणावर मराठा बांधव हे आरक्षणासाठी आंदोलन आणि निदर्शने करीत असताना मेळावा घेणे योग्य होणार नाही. मात्र मराठा समाजाच्या या आंदोलनाची दखल घेत शेतकरी मेळावा देखील रद्द करण्यात आल्याची माहिती आमदार कुणाल पाटील यांच्या वतीने देण्यात आली आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मंत्रालयातील दालनात ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रकियेमध्ये आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्याबाबत तसेच तपासणीअंती मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती विहित करण्यासाठी न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेली समिती आता पर्यंत केलेल्या कामकाजाची माहिती मंत्रिमंडळ उपसमितीसमोर देणार आहे.यासाठी तातडीची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

### शपथविधी सोहळा कधी आहे?

» मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारशी चर्चेची तयारी दर्शवली आहे. चर्चेसाठी येणार असाल तर मराठा समाज अडवणूक करणार नाही, असं जरांगे म्हणाले. माझ्या जातीला आरक्षण द्यायचं आहे त्यामुळं एक पाऊल मागं जायला तयार आहे. जे पुरावे हवे आहेत द्यायला तयार आहे. मला समाजाला न्याय द्यायचा आहे. सरकारनं चर्चेसाठी यावं, लवकर यावं पण एकदाच तोडगा काढावा, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. राज्य सरकारनं सोमवारी घेण्यात येत असलेली उपसमितीची बैठक रद्द करुन एक दिवसाचं विशेष अधिवेशन बोलवावं आणि कायदा मंजूर करुन आरक्षण द्यावं, असं म्हटलं आहे. राज्य सरकारनं तातडीनं विशेष अधिवेशन बोलवावं, आरक्षण देण्यासाठी पुरेसे पुरावे आहेत, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. दरम्यान, उद्यापासून आंदोलनाचा नवा टप्पा सुरु करणार असल्याचं ते म्हणाले.

---

# माझे जीवन सार्थकी लागले : आ. थोरात

## » सभासदांची सभासदांना 10 किलो साखर मोफत

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दुष्काळामुळे उसाचा तुटवडा आहे. गणेश बंद व्हावा, यासाठी टोकाचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र तरीही परमेश्वराच्या आशीर्वादाने धुराडे पेटले. इतर कारखान्यांच्या बरोबरीने उसाला योग्य भाव दिला जाईल.**



सभासदांची दिवाळी गोड व्हावी या भूमिकेतून सर्व सभासदांना 10 किलो साखर मोफत दिली जाईल, अशी घोषणा काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आ. बाळासाहेब थोरात यांनी केली. श्रीगणेश सहकारी साखर कारखान्याचा बॉयलर अग्नी प्रदीपन समारंभ ज्येष्ठ नेते आ. बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन युवा नेते विवेक भैय्या कोल्हे, श्रीगणेश कारखान्याचे चेअरमन सुधीर लहारे, व्हा. चेअरमन विजय दंडवते, ज्येष्ठ नेते एकनाथ गोंदकर, प्रभाताई घोगरे, सुधीर म्हस्के, शिवाजी लहारे, गंगाधर चौधरी आदींसह पदाधिकारी व संचालक उपस्थित होते. आ. थोरात म्हणाले, बॉयलर होवूच नये, यासाठी पराकोटीचे प्रयत्न झाले. मोठी अडथळ्यांची शर्यत सुरू आहे.

आचारसंहिता असताना

बेकायदेशीररित्या करार केला गेला. आता त्या कराराची भोकाडी दाखवून गणेश कारखान्याला कुठूनही आर्थिक मदत मिळू नये, यासाठी जोरदार प्रयत्न केले जात आहेत.

जिल्हा बँकेने मंजूर केलेले कर्ज नाकारले. गाळप परवान्यासाठी अर्ज केला, त्यामध्ये देखील या कराराची आडकाठी आणली गेली असे सांगत, आ. थोरात म्हणाले, विश्वास बसणार नाही, मात्र प्रवरा कारखान्याने गणेश कारखान्याकडून 81 कोटी रुपयांची मागणी केली आहे. हा आकडा दररोज वाढतो आहे. आपण अंतर्गत लेखापरीक्षण केलं, त्यांनीच नियुक्त केलेल्या शासकीय लेखापरीक्षकाकडूनही लेखापरीक्षण करून घेतलं, हा आकडा कोठेही जुळायला तयार नाही.

# एकनाथ शिंदे अपात्र झाले तरीही तेच मुख्यमंत्री!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

मागील दीड वर्षाहून अधिक काळापासून महाराष्ट्रात सत्तासंघर्ष सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या १६ आमदारांवर अपात्रतेची टांगती तलवार आहे. येत्या काही दिवसांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेसह संबंधित आमदार अपात्र ठरतील आणि मुख्यमंत्री पदावर इतर नेत्याची वर्णी लागेल, असा दावा विरोधी पक्षातील नेत्यांकडून केला जात आहे. या सर्व चर्चेवर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अपात्र होणारच नाहीत. मात्र ते अपात्र झाले तरीही तेच मुख्यमंत्री राहणार असं मोठं विधान देवेंद्र फडणवीसांनी केलं आहे. याबाबत त्यांनी 'प्लॅन बी' सांगितला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अपात्र ठरले तर त्यांना विधान परिषदेवर निवडून आणलं जाईल आणि तेच पुढे मुख्यमंत्री कायम राहतील, असं विधान फडणवीसांनी केलं. ते 'टीव्ही ९ मराठी'ला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या अपात्रतेवर भाष्य करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, "एक गृहितक म्हणून सांगतो की, एकनाथ शिंदेंना अपात्र ठरवलं तरी ते मुख्यमंत्री राहू शकतात. ते विधान परिषदेवर येतील पण ते अपात्र होणारच नाहीत. त्यामुळे एकनाथ शिंदे अपात्र होतील, असा तर्क लावणं चुकीचं आहे. आमच्याजवळ अशी संख्या आहे, ज्यामुळे कुणीही अपात्र झालं तरी आम्हाला काही अडचण नाही.

# रोजगार निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य!

## » मोदी यांच्या हस्ते 51 हजार नियुक्तीपत्रांचे वाटप

**।नवी दिल्ली।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (दि.२८) व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे ५० हजारांहून अधिक नियुक्ती पत्रांचे वितरण केले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नियुक्ती करणाऱ्यांना संबोधित केले. ते म्हणाले, "दिवाळीला थोडा वेळ आहे, पण ५०,००० नियुक्तीपत्रे मिळवणाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी हा प्रसंग दिवाळीपेक्षा कमी नाही.**



व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे ५० हजारांहून अधिक तरुणांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नियुक्ती पत्रांचे वितरण केले. देशभरात ३७ ठिकाणी रोजगार मेळावा आयोजित केला जाणार आहे. या उपक्रमाला पाठिंबा देणाऱ्या केंद्र सरकारच्या विभागांमध्ये तसेच राज्य सरकारे/केंद्रशासित प्रदेशांमध्ये भरती होत आहे. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी संबोधित केले. ते म्हणाले, "रोजगार मेळावा गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सुरू झाला. आतापर्यंत लाखो तरुणांना नियुक्ती देण्यात आली आहे. आज ५० हजारांहून अधिक तरुणांना सरकारी नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. दिवाळीला थोडा वेळ आहे, पण ५ हजार नियुक्तीपत्रे मिळवणाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी हा प्रसंग दिवाळीपेक्षा कमी नाही.

पुढे बोलत असताना ते म्हणाले की," देशातील विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये आयोजित 'रोजगार मेळावा' हा तरुणांप्रती असलेल्या आमच्या बांधिलकीचा पुरावा आहे. आमचे सरकार तरुणांचे भविष्य डोळ्यासमोर ठेवून काम करत आहे. केवळ रोजगारच देत नाही तर आम्ही संपूर्ण यंत्रणा पारदर्शक बनवत आहोत. त्यामुळे रोजगार प्रक्रियेवरचा लोकांचा विश्वास वाढला आहे. आम्ही केवळ भरती प्रक्रिया सुव्यवस्थित केली नाही तर काही परीक्षांची पुनर्रचनाही केली आहे. कर्मचाऱ्यांच्या भरती चक्रातील वेळ निवड आयोग निम्म्याने कमी केला आहे. एसएससीच्या परीक्षा आता हिंदी आणि इंग्रजी व्यतिरिक्त 13 प्रादेशिक भाषांमध्ये घेतल्या जातात. यामुळे भाषेच्या अडथळ्याचा सामना करणाऱ्यांना संधी मिळाली आहे."

### अर्थपूर्ण संधी प्रदान करेल

» देशभरातून निवडलेले नवीन कर्मचारी रेल्वे मंत्रालय, पोस्ट विभाग, गृह मंत्रालय, महसूल विभाग, उच्च शिक्षण विभाग, शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग आणि शिक्षण मंत्रालयासह विविध मंत्रालये/विभागांमध्ये रुजू होतील. रोजगार मेळावा हा रोजगार निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या पंतप्रधानांच्या वचनबद्धतेची पूर्तता करण्याच्या दिशेने हे एक पाऊल आहे. अशी अपेक्षा आहे की रोजगार मेळावा पुढील रोजगार निर्मितीमध्ये उत्प्रेरक म्हणून काम करेल आणि तरुणांना त्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि राष्ट्रीय विकासात सहभागासाठी अर्थपूर्ण संधी प्रदान करेल.

# दहशतवादाविरोधात नवे कायदे!

## » संसदीय समितीची 6 नोव्हेंबरला बैठक

**।नवी दिल्ली।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**विद्यमान भारतीय दंड संहिता (आयपीसी), फौजदारी प्रक्रिया संहिता (सीआरपीसी) आणि साक्षीपुरावा कायदा यांच्याऐवजी नवीन संहिता स्वीकारण्यासाठी मांडण्यात आलेल्या विधेयकाचा मसुदा अहवाल पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे शुक्रवारी स्वीकारण्यात आला नाही. या विधेयकाचा अभ्यास करण्यासाठी आणखी वेळ आवश्यक असल्याचे पत्र किमान दोन सदस्यांनी लिहिले होते. ते विचारात घेऊन विधेयकांची छाननी करणाऱ्या संसदेच्या स्थायी समितीने बैठक पुढे ढकलली आहे.**



'आयपीसी', 'सीआरपीसी' आणि 'पुरावा कायदा' बदलून त्यांच्याऐवजी 'भारतीय न्याय संहिता', 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' आणि 'भारतीय साक्ष विधेयक' आणण्याचा प्रस्ताव आहे. गृह मंत्रालयाच्या स्थायी समितीसमोर संबंधित विधेयकांची छाननी केली जात असून त्यांचा मसुदा अहवाल २७ ऑक्टोबरला स्वीकारायचा असल्याचे समितीच्या सदस्यांना कळवण्यात आले होते. मात्र, समितीचे अध्यक्ष ब्रिज लाल यांना लिहिलेल्या पत्रामध्ये या समितीला मुदतवाढ मिळावी अशी मागणी माजी केंद्रीय गृहमंत्री पी चिदम्बरम आणि तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओब्रायन यांनी केली आहे. तात्पुरत्या निवडणूक फायद्यासाठी घाईघाईने विधेयक मांडू नये असे त्यांनी समितीच्या अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रामध्ये नमूद केले होते. समाजातील उपेक्षित घटकांना लाभ मिळण्याच्या हेतूने मजबूत कायदे करण्यासाठी समितीने अंतिम अहवाल तातडीने स्वीकारू नये. तसे झाल्यास कायदेमंडळातर्फे छाननी प्रक्रियेची थट्टा केल्यासारखे होईल असा आक्षेप विरोधी पक्षाने घेतला होता. या समितीमध्ये एकूण ३० सदस्यांचा समावेश असून त्यातील १६ सदस्य सत्ताधारी भाजपचे आणि उरलेले १४ विरोधी पक्षांचे आहेत. मात्र, समितीने व्यापक प्रमाणात सल्लामसलत केली असून तीन महिन्यांमध्ये अहवाल स्वीकारला जाईल असा दावा भाजपकडून केला जात आहे. समितीची पुढील बैठक ६ नोव्हेंबरला होणार असून त्याच दिवशी मसुदा अहवाल स्वीकारला जाण्याची शक्यता आहे.

### कायदे बदलण्याची गरज

» हैदराबाद : दहशतवादाचा कठोरपणे सामना करण्यासाठी नव्या कायद्यांची आवश्यकता असल्याचे शहा यांनी भारतीय पोलीस सेवेतील परीविक्षार्थींच्या दीक्षांत समारंभात स्पष्ट केले. बिटिशकालीन कायदे बदलण्याची गरज आहे. हे कायदे १८५० मधील आहेत. सरकारने नव्या कायद्यात मोठ्या प्रमाणात बदल केले असून, ते संसदेपुढे ठेवले जातील असे शहा यांनी नमूद केले.

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लॅपटॉप



**।नवी दिल्ली।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

राजस्थानमध्ये काँग्रेसचे सरकार पुन्हा सत्तेवर आले तर छत्तीसगडप्रमाणे राजस्थानमध्येही गो-हमी योजना सुरू केली जाईल. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लॅपटॉपही देण्यात येतील. विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने अशी 5 आणखी आश्वासने दिली आहेत. काँग्रेसच्या वॉर रूममध्ये शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी राजस्थानातील ईडीच्या छाप्यांवर टीका केली. छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल मुंगेली जिल्ह्यातील एका बैठकीत, कुत्रे आणि मांजरींपेक्षा ईडीचे लोक रस्त्यावर जास्त फिरत आहेत, असे विधान केले होते. तोच धागा मुख्यमंत्री गेहलोत यांनी धरला. भाजपवाल्यांकडे मुद्दे नाहीत, त्यांना केवळ ईडी हाच एक आधार वाटतो, असेही गेहलोत म्हणाले. दोन दिवसांपूर्वी प्रियांका गांधींच्या सभेत महिलांना दरवर्षी 10 हजार रुपये आणि 500 रुपयांत गॅस सिलिंडर देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. छत्तीसगडच्या धर्तीवर गोहमी योजना. शेणखत 2 रुपये प्रतिकिलो दराने खरेदी करणार.

2. सरकारी इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून लॉटरी पद्धत बंद. सर्वांना प्रवेश दिला जाईल.

# आशकानं दिली गोड बातमी!

टिव्ही मनोरंजन विश्वातून एक आनंदाची बातमी समोर आली आहे. नागिन फेम अभिनेत्री आशका गोराडिया ही आई झाली आहे. तिने एका गोंडस मुलाला जन्म दिला आहे. आशका गोराडिया आणि ब्रेंट ग्लोब यांनी त्यांच्या पहिल्या बाळाचे स्वागत केले आहे. स्वत: अभिनेत्रीनेच या वृत्ताला दुजोरा दिला आहे. आशका गोराडिया आणि ब्रेंट ग्लोब यांनी सोशल मिडियावर पोस्ट शेयर करत ही गोड बातमी चाहत्यांनी दिली आहे. यासोबतच त्यांनी सोशल मिडियावर बाळाचा पहिला फोटो आणि नावही जाहिर केलं आहे. हा फोटो पोस्ट करत त्याने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'आज सकाळी 7:45 वाजता विल्यम अलेक्झांडर या जगात आला आणि थेट आमच्या हृदयात गेला. जरी मला माहित आहे की माझे जीवन या दिवसापूर्वीही अस्तित्वात होते, मला त्याबद्दल फारच कमी आठवते. आतापासून, मी मरेपर्यंत ॲलेक्सचा बाबा असेन.देवाच्या कृपेने आशकाने त्याला जन्म दिला आहे. ती आता विश्रांती घेत आहे, तिच्या शेजारी आमचे लहान बाळ आहे. आमचे अंतःकरण इतके जड कधीच नव्हते. असे प्रेम मी कधीच पाहिले नाही. आणि आता दररोज, माझ्याकडे देवाच्या अस्तित्वाचा जिवंत पुरावा असेल. आता त्यांची ही पोस्ट सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. चाहते या जोडाप्याचे कौतुक करत आहेत. जुही परमार, आमिर अली, रिद्धिमा पंडित, जन्नत जुबेर, किश्वर मर्चंटपासून मौनी रॉय अशा अनेक कलाकारांनी या जोडप्याचे अभिनंदन करत आहे. 1 डिसेंबर 2017 रोजी आशकाने ब्रेंट गोबलशी ख्रिश्चन आणि हिंदू पद्धतीने विवाह केला होता.

# सलमान सोसाइटीचा टीजर प्रेक्षकांच्या भेटीला!

मनोरंजन विश्वात सध्या मराठी चित्रपटांची चांगलिच चर्चा आहे. आता त्यातच 'सलमान सोसायटी' हा मराठी चित्रपट गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आला आहे. नुकतच या चित्रपटातील पहिलं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. 'पार्टी दणाणली...' असे या गाण्याचे बोल होते. या गाण्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. आता या चित्रपटाचा टीजर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'सलमान सोसायटी' हा चित्रपट शिक्षणावर भाष्य करतो. भारत देश साक्षर होईल तेव्हा भारताचा विकास होईल या आशयाचा हा सिनेमा आहे. चित्रपटाचा टीजर पाहिल्यानंतर चित्रपटाच्या कथेची कल्पना येते. एका लहानग्याला शाळेची ओढ या चित्रपटात दाखवली आहे. अनाथ मुलाची शिक्षण घेण्यासाठीची धडपड आणि त्यासाठी त्याने आणि त्याच्या सोबतच्या मित्रांनी लावलेली शक्कल या चित्रपटाच्या टिझरमध्ये दाखवण्यात आली आहे. या चित्रपटात गौरव मोरे एका वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तसेच पुष्कर लोणारकर, शुभम मोरे आणि विनायक पोतदार हे बाल कलाकार या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. 'सलमान सोसायटी' चित्रपटाचे दिग्दर्शन कैलाश पवार व निर्मिती रेखा सुरेंद्र जगताप , शांताराम खंडू भोंडवे व वैशाली सुरेश चव्हाण प्राजक्ता एण्टरप्राईजेसच्या बॅनर अंतर्गत करण्यात आली आहे.

# शिल्पाचा बिझनेस माइंड



बॉलीवूडमधील सर्वात सक्सेसफुल अभिनेत्रींपैकी एक शिल्पा शेट्टी कुंद्रा आता एक यशस्वी बिझनेसवुमन म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्यात व्यस्त आहे. यासाठी तिने आपली व्यावसायिक जाण खूप चांगली विकसित केली आहे. शिल्पा शेट्टी कुंद्रा 2 कोटींच्या गुंतवणुकीतून 15 कोटींहून अधिक कमावणार आहे. MAMAEARTH चा IPO येताच त्याच्या खिशात 15 कोटींहून अधिक रक्कम येईल. MAMAEARTH च्या मूळ कंपनीचे नाव HONASA CONSUMER आहे. MAMAEARTH च्या IPO चा प्राइस बँड 308 ते 324 रुपये प्रति इक्विटी शेअर घोषित करण्यात आला आहे. या पब्लिक इश्यूमधून गुंतवणूकदार पैसे कमावतील की नाही, हे शेअर्सच्या लिस्टनंतरच कळेल. IPO 31 ऑक्टोबर 2023 रोजी प्राथमिक बाजारात दाखल होईल. विशेष बाब म्हणजे बॉलीवूडची फिटेस्ट अभिनेत्री शिल्पा शेट्टी कुंद्रा आणि IPO च्या इतर प्रवर्तकांना 365 कोटी रुपयांच्या या IPO मधून अंदाजे 15.65 कोटी रुपये मिळतील. त्यामुळे, MAMAEARTH IPO कितीही लिस्ट केले तरी बी-टाउन अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या बँक खात्यात 15.65 कोटी रुपये येतील. MAMAEARTH IPO च्या ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस किंवा DRHP नुसार, शिल्पा शेट्टी कुंद्राचे नाव त्या प्रवर्तकांमध्ये आहे ज्यांनी MAMAEARTH च्या मूळ कंपनी HONASA CONSUMER LIMITED मधील त्यांचे स्टेक विकण्याची ऑफर दिली आहे.

# इमरान - जिनिलीया 15 वर्षांनी पुन्हा एकत्र!



२००८ साली आलेला जाने तु या जाने ना सिनेमा सर्वांना आठवत असेलच. या सिनेमाचं स्वतःचं एक वेगळं फॅन फॉलोईंग आहे. आजही हा सिनेमा पाहणारे असंख्य चाहते आहेत. अभिनेत्री जिनिलीया देशमुख आणि इमरान खान हे १५ वर्षांनी एकत्र आलेत. या दोघांना पाहुन चाहत्यांना जाने तु या जाने जा सिनेमाची आठवण आलीय. इमरान खान आणि जिनीलिया डिसूझा यांचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झालाय. त्यांच्या भेटीचा हा फोटो पाहून त्यांच्या चाहत्यांना मात्र आनंद झालाय. लीना अरान्हा नावाच्या एका इंस्टाग्राम यूजरने हा फोटो शेअर केला आहे. तिने याला कॅप्शन दिले, "या दोघांना भेटून नेहमीच आनंद होतो." या फोटोवर इमरानने कमेंट केलीय. या दोघांना १५ वर्षांनी एकत्र पाहुन सर्वांना जाने तु या जाने ना सिनेमाची आठवण आली इमरान खान जाने तू... या जाने ना, दिल्ली बेल्ली, लक, मेरे ब्रदर की दुल्हन, आय हेट लव स्टोरीज आणि एक मैं और एक तू अशा चित्रपटांसाठी ओळखला जातो. 2015 मध्ये तो कंगना रणौतसोबत कट्टी बट्टीमध्ये इमरान शेवटचा दिसला होता. तीन वर्षांनंतर, त्याने 'मिशन मार्स: कीप वॉकिंग इंडी' हा लघुपट दिग्दर्शित केला, जो त्याचा शेवटचा मुख्य प्रवाहातील सिनेमाचा प्रयत्न ठरला. त्यानंतर इमरान इंडस्ट्रीतुन गायब झाला. पण त्याचे चाहते त्याच्या कमबॅकची आतुरतेने वाट पाहत आहेत. जिनिलीया डिसूझाच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं झालं तर २०२३ च्या सुरुवातीलाच वेड सिनेमाच्या माध्यमातुन जिनिलीयाने संपुर्ण महाराष्ट्राच्या मनामनात राज्य केलं. याशिवाय जिनिलीया लवकरच आमिर खानच्या 'सितारे जमीन पर' मध्ये झळकणार आहे.तिने 2003 मध्ये 'तुझे मेरी कसम' या चित्रपटातून पदार्पण केले होते.

# लंडन विद्यापीठाकडून ट्विंकलचा गौरव!



बॉलिवूड अभिनेत्री ट्विंकल खन्ना ही नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. ती आता जरी मोठ्या पडद्यापासून दूर असली तरी सोशल मिडियावर तिची चर्चा रंगतेच. कधी काळी मोठा पडदा गाजवणारी ट्विंकल ही आता वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. काही दिवसांपुर्वी ट्विंकलने ती मास्टर्स करायला लंडनला गेल्याचे एका पोस्टमधून चाहत्यांना सांगितले होते. आता नुकतच ट्विंकलने तिचा मित्र आणि चित्रपट निर्माता करण जोहरबद्दल असं काही वक्तव्य केलं की ज्याची सर्वत्र चर्चा रंगली आहे. ट्विंकलने सोशल मिडियावर एक पोस्ट शेयर केली आहे ज्यात तिने लंडन विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी पूर्ण केल्याबद्दल आणि कवानाघ पुरस्कार प्राप्त केल्याची माहिती चाहत्यांना दिली आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये ट्विंकलने लिहिले की, "एक मोठा क्षण, आणि सुरुवातीला मला ते सर्वांना सांगायला थोडी लाज वाटत होती. पण हा क्षण दाखवतो की वय ही खरोखर फक्त एक संख्या आहे. जी तुमची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तुमच्या मार्गात कधीच अडथळा आणत नाही. मला माझ्या फायनल प्रबंधासाठी पदवी मिळाली आहे. आता लंडन विद्यापीठाच्या गोल्डस्मिथ्सने पॅट कावनाघ पुरस्कारासाठी निवडले आहे. यानिमित्ताने मी सांगू इच्छितो की, कदाचित माझ्या जुन्या मित्राने 'स्टुडंट ऑफ द इयर'मध्ये चुकीच्या कलाकारांना कास्ट केले असावं. या पोस्टमध्ये तिने एक पत्रही शेअर केले आहे, ज्यात असे म्हटले आहे की तिचा पोर्टफोलिओ पॅट कवानाघ पुरस्कारासाठी निवडला गेला आहे, जो गोल्डस्मिथ्सच्या एमए इन क्रिएटिव्ह आणि लाइफ रायटिंग प्रोग्राममधील सर्वोत्कृष्ट कामासाठी दरवर्षी दिला जातो. आता ट्विंकलची ही पोस्ट सोशल मिडियावर व्हायरल झाली आहे. अनेक कलाकारांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. तर ट्विंकल खन्नाचा पती अभिनेता अक्षय कुमारने देखील आपल्या पत्नीचे अभिनंदन करत प्रतिक्रिया दिली आहे.

# रचिन-निशमची झूंज व्यर्थ!

## » ऑस्ट्रेलियाचा न्युझिलंडवर 5 धावांनी विजय

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील २७ वा सामना आज (दि.२८) धर्मशाला येथे ऑस्ट्रेलिया विरूद्ध न्यूझीलंड झाला. संपूर्ण सामन्यांवर फलंदाजांचे वर्चस्व राहिले. ३८९ धावांचा पाढलाग करताना न्यूझीलंडचा स्टार फलंदाज रचिन रवींद्रने ७७ चेंडूत ७ चौकार आणि ५ षटकाराच्या मदतीने धडाकेबाज शतकी खेळी यांनतर निशमचे झंझावती अर्धशतक व्यर्थ ठरले. यानंतर अखेर ५ धावांनी ऑस्ट्रेलियाने न्यूझीलंडवर विजय मिळवला. या विजयाने ऑस्ट्रेलिया आणखी दोन गुण आपल्या नावावर केले आहेत. तर हा न्यूझीलंड या स्पर्धेतील दुसरा पराभव ठरला आहे. या सामन्यात दोन्ही डावात मिळून ७७१ धावांची खेळी क्रिकेट प्रेमींना पहायला मिळाली.**




न्यूझीलंडचा कर्णधार टॉम लॅथमने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाची सुरुवात चांगली झाली होती. ट्रॅव्हिस हेडने विश्वचषकातील पहिला सामना खेळताना अवघ्या ५९ चेंडूत शतक झळकावले. त्याचे वनडे कारकिर्दीतील हे चौथे शतक होते. डोक्याला दुखापत झाल्याने तो सुरुवातीचे काही सामने खेळू शकला नाही. त्याने वॉर्नरसोबत पहिल्या विकेटसाठी ११७ चेंडूत १७५ धावांची भागीदारी केली होती. हेडने ६७ चेंडूत १० चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने १०९ धावांची खेळी केली. त्याचवेळी वॉर्नर ६५ चेंडूंत पाच चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने ८१ धावा करून बाद झाला. स्टीव्ह स्मिथही १८ धावा करून माघारी परतला.

ग्लेन फिलिप्सने या तिन्ही विकेट घेतल्या. मिचेल मार्श ३६ धावा करून बाद झाला तर मार्नस लॅबुशेन १८ धावा करून बाद झाला. त्यानंतर ग्लेन मॅक्सवेलने २४ चेंडूत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ४१ धावांची तुफानी खेळी केली. त्याचवेळी जोश इंग्लिशने २८ चेंडूत चार चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ३८ धावा केल्या. कर्णधार पॅट कमिन्सने १४ चेंडूत दोन चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ३७ धावा केल्या. ४९ व्या षटकात ट्रेंट बोल्टने एकाच षटकात तीन बळी घेतले. इंग्लिश आणि कमिन्सशिवाय त्याने झाम्पाला बाद केले. त्यानंतर ५० व्या षटकात मॅट हेन्रीने मिचेल स्टार्कला नीशमकडे झेलबाद केले आणि ऑस्ट्रेलियाचा डाव ३८८ धावांवर संपवला. न्यूझीलंडकडून ट्रेंट बोल्ट आणि ग्लेन फिलिप्सने प्रत्येकी तीन बळी घेतले., मिचेल सँटनरने दोन विकेट घेतल्या तर हेन्री आणि नीशम यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. वॉर्नरने २८ चेंडूत आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील ३२ वे अर्धशतक झळकावले.

यापूर्वी त्याने श्रीलंका आणि नेदरलँड्सविरुद्ध शतके झळकावली होती. आठ षटकांनंतर ऑस्ट्रेलियाने एकही विकेट न गमावता ९३ धावा केल्या होत्या. ट्रॅव्हिस हेडनेही २५ चेंडूत त्याचे १६ वे अर्धशतक केले. ऑस्ट्रेलियाने दिलेल्या ३८९ धावांचे लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडने आश्वासक सुरवात केली. न्यूझीलंडला पहिला धक्का आठव्या षटकात ६१ धावांवर बसला. जोश हेझलवूडने डेव्हन कॉनवेला मिचेल स्टार्ककरवी झेलबाद केले. त्याने 17 चेंडूत 28 धावा करता आल्या. यानंतर ७२ धावांवर न्यूझीलंडने विल यंगही तंबूत परलता त्याला जोश हेझलवूडने त्याला मिचेल स्टार्ककरवी झेलबाद केले. त्याने 37 चेंडूत 32 धावा केल्या.

### ट्रॅव्हिस हेडचे 59 चेंडूत शतक

» ट्रॅव्हिस हेडने विश्वचषक २०२३ चा पहिला सामना खेळताना केवळ ५९ चेंडूत शतक झळकावले. त्याचे वनडे कारकिर्दीतील हे चौथे शतक आहे. दुखापतीमुळे तो सुरुवातीचे काही सामने खेळू शकला नाही. आता त्याचे संघात पुनरागमन झाले आहे. त्याने वॉर्नरसोबत पहिल्या विकेटसाठी ११७ चेंडूत १७५ धावांची भागीदारी केली. ५९ चेंडूतील शतक हे या विश्वचषकातील तिसरे जलद शतक आहे. ग्लेन मॅक्सवेलने ४० चेंडूत शतक तर एडन मार्करामने ४९ चेंडूत शतक झळकावली आहेत.

# भारताची ऐतिहासिक कामगिरी!

## » आशियाई गेम्समध्ये 111 पदकांची कमाई

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चीनमध्ये पार पडलेल्या आशियाई पॅरा गेम्समध्ये भारतीय खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत १११ पदकांची कमाई केली आहे. यामध्ये २९ सुवर्ण, ३१ रौप्य आणि ५१ कांस्य पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत चीनने ५२१ पदकं मिळवत पहिले स्थानी तर भारताने १११ पदकांची कमाई करत पाचवे स्थान पटकावले आहे.**




### मोदींकडून खेळाडूंचे अभिनंदन

» हा एक अतुलनीय आनंदाचा क्षण. हे यश आमच्या खेळाडूंची निखळ प्रतिभा, मेहनत आणि दृढनिश्चयाचे फळ आहे. हा उल्लेखनीय मोलाचा क्षण आमचे हृदय अपार अभिमानाने भरून टाकणार आहे. मी आमचे अतुलनीय खेळाडू, प्रशिक्षक आणि त्यांच्यासोबत काम करणाऱ्या संपूर्ण सपोर्ट सिस्टमचे मनापासून कौतुक करतो आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो." असे पंतप्रधान मोदी यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

जकार्ता येथे २०१८ साली झालेल्या आशियाई पॅरा गेम्स स्पर्धेत भारताने १५ सुवर्ण, २४ रौप्य आणि ३३ कांस्य अशी एकूण ७२ पदके मिळवली होती; पण यंदा चीनमध्ये झालेल्या स्पर्धेत भारताने पदकांचे शतक झळकावले. आज (दि.२८) आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेच्या अंतिम दिवशी (दि.२८) भारताने एकूण १११ पदके आपल्या नावावर केली. चीनमधील हांगझोऊ येथे सोमवार (दि.२३) ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या आशियाई पॅरा गेम्सची आज सांगता झाली. आशियाई पॅरा गेम्समध्ये १०० पदके मिळवणे हा आनंदाचा क्षण असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या X अकाउंटवर पोस्ट करत म्हटले आहे. आशियाई पॅरा गेम्समध्ये १०० पदके! हा एक अतुलनीय आनंदाचा क्षण. हे यश आमच्या खेळाडूंची निखळ प्रतिभा, मेहनत आणि दृढनिश्चयाचे फळ आहे. हा उल्लेखनीय मोलाचा क्षण आमचे हृदय अपार अभिमानाने भरून टाकणार आहे. मी आमचे अतुलनीय खेळाडू, प्रशिक्षक आणि त्यांच्यासोबत काम करणाऱ्या संपूर्ण सपोर्ट सिस्टमचे मनापासून कौतुक करतो आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

# वेटलिफ्टिंगमध्ये महाराष्ट्राच्या कोमल वाकळेला सुवर्णपदक




नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

कांपाल पणजी येथील क्रीडा नगरीत आज (दि. २८) झालेल्या 87 वजनी गटाच्या महिलांच्या वेटलिफ्टिंगमध्ये महाराष्ट्राच्या कोमल वाकळे हिने एकूण 205 किलो वजन उचलून सुवर्णपदक प्राप्त केले.

कर्नाटकाच्या बी. एन. उषा हिने 203 किलो वजन उचलून रौप्य पदक मिळवले तर हरियानाची राखी हिने 196 किलो वजन उचलून कांस्य पदक पटकावले. कर्नाटकांची वेटलिफ्टिंग खेळाडू उषा एस आर हिला दुखापतीमुळे स्पर्धेतून माघार घ्यावी लागली. या गटात गोव्याची वेटलिफ्टर तनुजा कुकळकर हिने बराच संघर्ष केला मात्र तिला पदक प्राप्त करणे शक्य झाले नाही.